**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
**(*https://jetjournal.us/*)**
**Volume 15, Issue 2 – 2025**

UGC CARE I

# नाशिक शहरातील औद्योगिक महिला कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीतील बदलांचा अभ्यास

**श्रीमती युवराज्ञी मेवालाल मथुरे**, संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित के. आर. टी. आर्ट्स, बी. एच. कॉमर्स अँड ए. एम. सायन्स (के. टी. एच. एम.) कॉलेज, नाशिक

**डॉ. नारायण नामदेव गाढे**, मार्गदर्शक, प्रोफेसर, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक

**डॉ. अमोल गायकवाड**, सह-मार्गदर्शक, के. आर. टी. आर्ट्स, बी. एच. कॉमर्स अँड ए. एम. सायन्स (के. टी. एच. एम.) कॉलेज, नाशिक

## प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्थेत परंपरेने पुरुषांना उच्च स्थान प्राप्त झालेले असून महिला वर्गाला कनिष्ठ स्थान असलेले दिसते. भारतात आजच्या एकविसाव्या शतकातही पुरुषप्रधान संस्कृती अस्तित्वात असलेली दिसते. मागील दशकांचा आढावा घेतला तर एक गोष्ट लक्षात येते की, पूर्वीच्या समाज व्यवस्थेतील महिला कामगारांचे स्थान आजच्या काळातील महिला कामगारांच्या स्थानापेक्षाही कमी दर्जाचे होते. परंतु आजची वास्तव परिस्थिती बघता महिला मोठ्या प्रमाणात शिक्षित होतांना दिसतात. आजच्या आधुनिक काळात शहरीकरण, वेगाने होणारे औद्योगिकीकरण, जलद गतीने होणारा शिक्षणाचा प्रसार यामुळे आजच्या काळातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसतात.

आधुनिक काळातही औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. शहरी भागाचा विचार केला तर शहरी भागात उद्योगांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. परंतु ग्रामीण भागाचा विचार केला तर शहरी भागाच्या उलट परिस्थिती दिसून येते. पण तरीही आज ग्रामीण भागात महिला कामगारांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होताना दिसतात. त्यामुळेच महिला कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये बदल होताना दिसून येतो, आधुनिकतेच्या दृष्टिकोनातून महिला कामगारांची औद्योगिक क्षेत्रातील परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आता कुठे दिसत आहे. त्यामुळे महिला कामगारांच्या राहणीमानात सुधारणा होत असल्याचेही आढळून येते. भारताची ऐतिहासिक परंपरा वर्षानुवर्ष पितृसत्तेच्या अधीन राहून बऱ्याच निर्णय प्रक्रियेत महिलांना सामावून घेतले जात नाही. अगदी आजचे वास्तव पाहता २१ वे शतकही त्याला अपवाद नाही, पुरातन काळाचा विचार करता आजच्या काळापर्यंत स्त्रियांच्या सद्यस्थितीमध्ये दिवसेंदिवस बदल होताना दिसतात. २१ वे शतकही खऱ्या अधनि वास्तविकतेची पहाट घेऊन आले होते. समाजाची सांस्कृतिक प्रगती आजमावण्यासाठी त्या समाजात स्त्रीचे स्थान कसे आहे याचा आढावा घेणे अत्यंत गरजेचे आहे. वैदिक काळापासून आजपर्यंत महिलांच्या स्थितीमध्ये सतत चढ-उतार झालेले दिसतात.

तिला कधी देवी समजून तिची आराधना केली जाते तर कधी तिला दासी समजून तिची अवहेलना केली जाते. समाजातील काही स्त्रियांच्या बाबतीत मूठभर स्त्रियांना समाजात समानता व दर्जा प्राप्त झालेला दिसत असला तरी एकंदरीत सर्वच स्त्रियांना तो मिळाला नाही. आधुनिक काळामध्ये शिक्षणाच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2 – 2025



माध्यमातून महिला आत्मनिर्भर बनत आहे. महिला स्वावलंबी झाल्यामुळे त्यांच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. महिला वर्गाच्या दुसऱ्यावर अवलंबून राहण्याच्या प्रक्रियेत अलीकडील काळात बदल झालेला दिसतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे,

३. महिला कामगारांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेऊन उपाय योजना सुचवणे.

**गृहीतके :**

१) नाशिक शहरात औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी संशोधिकेने सातपूर औद्योगिक वसाहतीत १०० औद्योगिक महिला कामगारांची सदर अभ्यासासाठी निवड केलेली आहे. नमुना निवड करण्यासाठी नमूना निवड केलेली आहे. मुलाखत अनुसूचीद्वारे प्राथमिक तथ्य संकलन करून माहितीचे निर्वचन करण्यात आले आहे. सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच तथ्य विश्लेषणासाठी एम एस एक्सल या संगणक आज्ञावलीचा वापर करण्यात आलेला आहे.

**महिला कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती :**

समाजातील महिलांचा दर्जा उंचावण्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणावर दिला जाणारा भर होय. महिलांच्या शिक्षणाचा स्तर उंचावल्यामुळे समाजातील महिलांना आपल्या अर्थजनाचे एक महत्त्वाचे साधन प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना सामावून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्त्रिया या समाजाचा एक आविभाज्य घटक आहे आणि समाजाचा विकास करताना महिलेकडे विकासाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून पहिले जाते. पण तरीही महिलेला समाजात आजपर्यंत दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे त्या आजपर्यंत संधीवंचित, सत्तावंचित व प्रतिष्ठावंचित राहिलेल्या दिसून येतात. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत बदल झालेला दिसतो. औद्योगिकीकरण, खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून औद्योगिक क्षेत्रात विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय, आणि कारखाने निर्माण झालेले दिसून येतात या कारखान्यांमध्ये औद्योगिक क्षेत्रात केवळ पुरुषच कामगार काम करताना दिसतात असे नसून पुरुषाच्या बरोबरीने महिलाही स्वतःच्या अर्थजनासाठी घराबाहेर पडलेल्या दिसून येतात.

आधुनिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी विविध गोष्टींचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. जसे की, सदर महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन संशोधिकेने महिला कामगारांची शैक्षणिक पात्रता, औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या कामाचे स्वरूप, महिला कामगारांच्या कुटुंबाचा प्रकार, महिला कामगारांची वैवाहिक स्थिती, महिलांचे नोकरी करण्याचे कारण, महिला कामगारांचे मासिक उत्पन्न, महिला


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025
UGC CARE I


कामगारांच्या महिन्याचा कौटुंबिक खर्च, पैशाची बचत, इत्यादी विषयी माहितीचे संकलन करून विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. १**

**वयोगटानुसार वर्गीकरण**

| **अ.क्र.** | **महिला कामगारांचा वयोगट (वर्ष)** | **महिला कामगारांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | २० ते ३० | ४५ | ४५ |
| २ | ३१ ते ४० | ४० | ४० |
| ३ | ४१ ते ५० | १५ | १५ |
| एकूण | | १०० | १०० |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन




सदर संशोधनात एकूण प्रतीसादांपैकी सर्वात कमी महिला कामगार ह्या स्वीपर या पदावर काम करणाऱ्या २० % टक्के महिला असून या महिला २६ ते ३० या वयोगटातील असलेल्या दिसतात.

**महिला कामगारांची शैक्षणिक पात्रता :**



Copyright © | JET Network, All Rights Reserved

तक्ता क्र. २

शैक्षणिक पात्रतेनुसार महिला कामगारांचे वर्गीकरण

| अ, क्र. | शैक्षणिक पात्रता | महिला कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | ६ | ६ |
| २ | प्राथमिक शिक्षण | १४ | १४ |
| ३ | माध्यमिक | ४८ | ४८ |
| ४ | उच्च माध्यमिक | २४ | २४ |
| ५ | पदवी | ०७ | ०७ |
| ६ | पदव्युत्तर | ०१ | ०१ |
| एकूण | | १०० | १०० |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन




समाजात प्रतिष्ठित पदावर काम करत असलेल्या महिला कामगारांची शैक्षणिक पातळी उच्च आहे. त्या महिलांनी समाजात उच्च शिक्षण पूर्ण केलेले आहे.

उदा. सुपारवायजर या पदावर काम करणाऱ्या एकूण महिला कामगारांपैकी ४८ % टक्के महिला कामगारांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. तर ०१% टक्के महिला कामगारांनी पदव्यूतर शिक्षण पूर्ण


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025



केलेले आहे, तर हेच प्रमाण क्लार्क आणि रिसेप्शनिस्ट, स्वीपर या पदावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या बाबतीत आढळते. सामाजिक दृष्टीने दुय्यम समजल्या जाणाऱ्या पदावर कार्यरत असल्याचे निदर्शनास येते.

**औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांचे कामाचे स्वरूपः**

**तक्ता क्रमांक ३**

**कामाचे स्वरूप**

| अ.क्र. | स्वरूप | महिला कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | कायम | १५ | १५ |
| २ | कंत्राटी/तात्पुरत्या | ८५ | ८५ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन

औद्योगिक क्षेत्रात ज्या महिला कामगार काम करतात त्यांच्या कामाचे स्वरूप हे इतर क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांपैकी काही महिला कामगार ह्या कायमस्वरूपी कार्यरत असून काही महिला कामगार ह्या तातपुरत्या किंवा कंत्राटी पदावर कार्यरत असलेल्या दिसून येतात. सद्यस्थितीचा विचार करता, औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांपैकी कायमस्वरूपी कार्यरत असलेल्या महिला कामगारांची संख्याही १५ टक्के असून जास्त संख्या हि ८५% टक्के महिला ह्या तात्पुरत्या किंवा कंत्राटी पदावर कार्यरत असलेल्या दिसतात.

**औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची वैवाहिक स्थिती:**

**तक्ता क्रमांक ४**


**वैवाहिक स्थिती**

| अ.क्र. | महिला कामगारांची वैवाहिक स्थिती | महिला कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | ७९ | ७९ |
| २ | अविवाहित | २१ | २१ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2 – 2025


औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांचा विचार केला तर सर्वात जास्त प्रमाण विवाहित महिला कामगारांचे असून ते ७९% टक्के इतके आहे. तर औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या अविवाहित महिला कामगारांचे प्रमाण खूप कमी असून ते २१% टक्के आहे.. म्हणजेच औद्योगिक क्षेत्रात काम कारणाऱ्या महिला कामगारांनपेकी जास्तीत जास्त प्रमाण हे वैवाहिक महिला कामगारांचे आहे.

**औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांचे नोकरी करण्याचे कारण**

**तक्ता क्रमांक ५**


**नोकरी करण्याचे कारण**

| अ.क्र. | महिला कामगारांचे नोकरी करण्याचे कारण | महिला कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | हलाखीची आर्थिक स्थिती | ७२ | ७२ |
| २ | स्वावलंबनासाठी | १५ | १५ |
| ३ | रिकामी बसण्यापेक्षा काहीतरी काम करावे म्हणून | १३ | १३ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2 – 2025
UGC CARE I




औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या १०० टक्के महिला कामगारापैकी ७२% टक्के महिला कामगार ह्या आर्थिक गरज म्हणून काम करतात. १५% टक्के महिला कामगार ह्या स्वतःच्या स्वावलांबनसाठी मेहनत करताना दिसून येतात. १३% टक्के महिला कामगार या रिकामी बसण्यापेक्षा काहीतरी काम करावे म्हणून नोकरी करतात याचा नीट अर्थ लक्षात घेतला तर समजते की, औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगार या कामाची आवड म्हणून नोकरी न करता आर्थिक गरज, स्वतः च्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारत स्वावलंबी म्हणून नोकरी करताना दिसतात.

**महिला कामगारांचे महिन्याचे मासिक उत्पन्न :**


**तक्ता क्रमांक ६**

**मासिक उत्पन्नानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | मासिक उत्पन्न (रुपयामध्ये) | महिला कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | ५००० पेक्षा कमी | .०४ | .०४ |
| २ | ५००० ते १०००० | ३६ | ३६ |
| ३ | १०००० ते २०००० | ४० | ४० |
| ४ | २०००० पेक्षा जास्त | २० | २० |
| एकूण | | १०० | १०० |

स्त्रोत: प्राथमिक माहिती संकलन


Copyright © | JET Network, All Rights Reserved




औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला कामगारांच्या मासिक उत्पन्ना वरुन समाजातील औद्योगिक महिलांची आर्थिक स्थिती लक्षात येते. एकूण १०० महिलांपैकी सदर संशोधनासाठी निवडलेल्या ४ महिला कामगारांचे मासिक उत्पन्न हे ५००० रु. पेक्षा कमी आहे. ३६ % टक्के महिला कामगारांचे मासिक उत्पन्नही ५००० ते १०००० हजार रुपये इतके आहे. तर ४०% टक्के महिला कामगारांचे मासिक उत्पन्न हे १०००१ ते २०००० हजार रुपये इतके आहे. तसेच २० महिला कामगारांचे मासिक उत्पन्न २०००० हजार रुपयांपेक्षा जास्तच आहे. म्हणजेच बहुतांशी महिला कामगारांचे मासिक उत्पन्न ५००० ते २०००० हजार रुपये इतके आहे. म्हणजेच सर्व सामान्य वेतनावर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे सर्वांत जास्त असून ६३.९% इतके आहे.

**औद्योगिक महिला कामगारांच्या मासिक पगारातील पैशाची बचत व बचतीचा प्रकार:**

औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांचे उत्पन्न व कौटुंबिक खर्च यांचा ताळमेळ घालण्याचा प्रयन करताना जास्तीत जास्त महिला ह्या बचत करताना आढळून आल्या, महिला कामगारांचे मासिक पगारातील पैशाची बचत करण्याचे प्रमाण ज्या महिला कामगार बचत करित नाही त्यांच्यापेक्षा जास्त दिसून आले. समाजातील महिला वर्गाचा विचार केला तर बचत करणाऱ्यांमध्ये महिला ह्या अधिक प्रमाणात बचत करतात. महिला ह्या मिनी बँक व भिशीमध्ये मोठ्या प्रमाणावर बचत करतात. तर पोस्ट ऑफिस व विमामध्ये बचतीचे प्रमाण तुलनेने खूपच कमी असते.

आधुनिक क्षेत्रातील महिला कामगारांचा महिन्याचा कौटुंबिक खर्च हा प्रस्तूत संशोधनातील १०० महिला कामगारांपैकी ८० महिला कामगारांचा (महिला कौटुंबिक खर्च रु.५००० ते १०००० रु. इतका आहे) एकूण महिला कामगारांपैकी फक्त १० टक्के महिला कामगारांचा कौटुंबिक खर्च हा १५००० पेक्षा जास्त असल्याचे दिसते. म्हणजेच बहुतांशी महिला कामगारांच्या महिन्याचा कौटुंबिक खर्च हा ५००० ते १०००० रुपये इतका आहे.

**निष्कर्ष :**

१. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच महिला कामगार ह्या विवाहित असून त्या ४० वर्षापेक्षाही जास्त वयाच्या आहेत.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बऱ्याच महिला कामगार ह्या एकत्र कुटुंबात राहत नसून त्या विभक्त कुटुंबात राहतात.
३. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या जवळ-जवळ सर्वच महिला कामगारांचा कामाचा कालावधी हा १० तासांपेक्षा कमी असल्याने जास्तीत जास्त महिला कामगार ह्या दिवसपाळीमध्ये काम करताना दिसतात.
४. औद्योगिक क्षेत्रातील बऱ्याच महिला कामगार या आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्यामुळे स्वतःच्या कौटुंबिक उदर निर्वाहासाठी आणि स्वावलंबनासाठी नोकरी करतात.
५. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार ह्या महिन्याच्या कौटुंबिक खर्चामुळे त्यांना मिळणारे वेतन व इतर भत्ते याबद्दल महिला कामगार असमाधानी आहेत.
६. औद्योगिक क्षेत्रातील बहुतांशी महिला कामगारांच्या युनिटमध्ये आरोग्य तपासणी वैद्यकीय भत्ता आरोग्य विमा योजना यासारख्या सुविधा पुरविल्या जातात
७. समाजातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या ज्या महिला आहेत त्या महिला कामगारांच्या मुलांसाठी बहुतेक ठिकाणी पाळणाघराची सोय केलेली आहे
८. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांपैकी कमी शिक्षित असलेल्या महिला कामगारांची संख्या जास्त असून त्या कमी दर्जाचे काम करताना दिसतात तर उच्चशिक्षित महिला कामगारांची संख्या जास्त असून त्या उच्च दर्जाचे काम करताना दिसतात
९. समाजातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारां पैकी कायमस्वरूपी महिला कामगारांचे प्रमाण अतिशय कमी आहे

**शिफारशी व उपायोजना : शिफारशी**

१. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांना किमान वेतन कायद्याची अमलबजावनी करून त्यानुसार वेतन द्यावे.
२. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांना २ वर्ष नोकरी केल्यावर कायमस्वरूपी नोकरी द्यावी.
३. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांना कामाच्या ठिकाणी स्वच्छता, पिण्याचे पाणी, दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
४. महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी समिती स्थापन करावी.
५. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांसाठी कंप्लेंट बॉक्स ठेवावा.
६. औद्योगिक क्षेत्रातील काम करणाऱ्या महिला कामगारांना शक्यतो दिवस पाळीमध्येच काम द्यावे व त्यांच्यासाठी स्वतंत्र विश्रामगृहाची सोय करावी. त्यामध्ये स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय आणि उपहारगृह यांची सोय मुख्यतः करण्यात यावी.
७. समाजातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या लहान मुलांसाठी कंपनीने सर्वसोयी-सुविधानी युक्त अशा पाळणागृहाची सोय करावी.
८. औद्योगिक वसाहतींमधील कंपनी व्यवस्थापनाने कुशल व अ कुशल महिला कामगारांसाठी विविध प्रकारची शिबिरे व प्रशिक्षणे आयोजित करावी.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2 – 2025



९. महिला सबलीकरण करण्यासाठी शासनामार्फत महिला कामगारांसाठी कमी व्याजदराने आर्थिक पुरवठा करून औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांचे सबलीकरण करावे.

१०.औद्योगिक वसाहतीमध्ये काम करत असणाऱ्या महिला संघटनानी महिला कामगारांना येणाऱ्या अनेक अडचणींवर मार्गदर्शन करावे व त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्याचा प्रयत्नही करावा.

११.समाजातील औद्योगिक वसाहतींमध्ये कार्यरत असणाऱ्या महिला कामगारांना कंपनीकडून नियमित वेतन वाढ बोनस देण्यात यावा त्याचबरोबर अशा महिला कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधीसाठी ही सोय करावी.

१२.औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना कंपनीने एका ठराविक कालावधीनंतर कायमस्वरूपी नोकरीवर घेण्याची सुरक्षितता प्रदान करावी

१३.देशात ज्या वेगाने महागाईचा दर वाढत आहे त्या अनुषंगाने होणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी कंपन्यांनी महिला कामगारांची वेतन निश्चिती केली पाहिजे.

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी सरकार मार्फत कारखान्यांमार्फत, कामगार संघटना, सामाजिक संघटना यांनी योग्य ती पावले उचलून अनेक कायदेशीर तरतुदी करून त्यानुसार योग्य ती अंमलबजावणी करून औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न करावा कारण देशाचा समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी महिलांचाही सहभाग तितकाच महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ:**

१. प्रा. लीला पाटील (सप्टेंबर २०१७) मासिक उद्योजक महिला उद्योजकता लेखः -महिलांचे कर्तुत्व समाजासमोर यायला हवे.
२. प्रा. उमेशचंद्र दंडगव्हाळ लेख औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी. मासिक :- उद्योजकता (मे २०१८) पान नंबर:- ३७
३. शीर्षक :- उद्योग संचनालय महाराष्ट्र शासन यांच्या योजना, प्रा नंदिनी आत्मसिद्ध मासिकः- उद्योजकता (पान.न. १५) (जून २०१८)
४. लेख:- महिलांच्या प्रगतीचा उंचावणारा आलेख. भारतीय महिलांचे उद्योजकता
५. मासिक, दीपावली पान.न. २१ हेमंत देसाई (२०१८) लेख: स्त्री शक्ती राष्ट्राची शक्ती व्हावी :- महिलांचे योगदान
६. पुस्तके-
७. औद्योगिक अर्थशास्त्र प्रा. डॉ. स. श्री. मु.देसाई, प्रा. डॉ. निर्मल भालेराव
८. प्रकाशन निराली जून-१९९७
९. भारतीय अर्थव्यवस्था भाग १ प्रा. अशोक डांगे प्रा. ए. आर. रायखेलकर आहेरकर विद्या प्रकाशन, नागपूर,
१०.www.ncbi.nlm.nit.gov.
११.https://www.researchgate.net
१२.https://mlwb.in


Copyright © | JET Network, All Rights Reserved